जनसंपर्क कक्ष

2 7 OCT 2021

लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# १२४५ विद्यार्थ्यांनी दिली प्रवेश परीक्षा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील विविध अभ्यासक्रमांच्या एम. फिल., पीएचडी अभ्यासक्रमाची प्रवेश परीक्षा ऑफलाईन पद्धतीने मंगळवारपासून सुरू झाली. याअंतर्गत पहिल्या दिवशी १२४५ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. त्यात सिव्हील इंजिनिअरींग, रसायनशास्त्र आदी १७ अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांचा समावेश होता. विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाने बी. एस्सी., एम. एस्सी. (नॅनो सायन्स सत्र पाच आणि सहा), एमएसडब्ल्यू (सत्र एक आणि दोन), एम. टेक (रूरल टेक सत्र एक आणि दोन) अशा आठ परीक्षांचा निकाल जाहीर केला.

कोल्हापुरातील श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, सांगलीतील मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय आणि सातारा येथील यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स या केंद्रांवर सोमवारी प्रवेश परीक्षा झाली. त्यासाठी कॉम्प्युटर ॲप्लिकेशन, शिक्षणशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र, इतिहास, आदी १७ विषयांच्या परीक्षेसाठी एकूण १९२३ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी १२४५ जणांनी सकाळी दहा ते सायंकाळी सहा यावेळेत प्रत्येकी दोन तासांच्या विविध सत्रात परीक्षा दिली.

पुढारी

# विद्यापीठात शनिवारी ऑनलाईन व्याख्यान

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ गांधी अभ्यास केंद्र संयोजित डॉ. उषा मेहता व्याख्यानमालेंतर्गत 'देशभक्त केशवराव जेधे : कार्यकर्तृत्व' या विषयावर शनिवार (दि. ३०) ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता ऑनलाईन व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. प्रमुख वक्ते म्हणून प्रा. डॉ. अरुण भोसले असणार आहेत. अध्यक्षस्थान किशोर बेडकीहाळ (सातारा) हे भूषविणार आहेत. व्याख्यानाचा लाभ घ्यावा, असे आवाहन गांधी अभ्यास केंद्राच्या समन्वयक प्रा. डॉ. भारती पाटील यांनी केले आहे.

पुढारी

# डॉ. आंबेडकर यांच्यावरील महाकाव्य ग्रंथ कृतज्ञतेने ओथंबलेला : डॉ. शिर्के

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावरील २०२१ कवितांचा समावेश असलेला महाकाव्य ग्रंथ कृतज्ञतेने ओथंबलेला आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांनी केले.

तरोडा-खुर्द (जि. नांदेड) येथील प्रा. अशोककुमार दवणे यांनी संपादित केलेल्या 'महामानव' या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याविषयीच्या २०२१ कवितांचा समावेश असलेल्या महाकाव्यग्रंथाचे महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यांमध्ये एकाच वेळी प्रकाशन करण्यात आले. कोल्हापूर येथील प्रकाशन सोहळा कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते विद्यापीठ कार्यालयात पार पडला, यावेळी ते बोलत होते.

प्रास्ताविक डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राचे संचालक डॉ. एस.एस. महाजन यांनी केले. डॉ. ज्ञानराजा चिघळीकर यांनी आभार मानले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील, जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर, नामदेवराव कांबळे आदी उपस्थित होते.

पुढारी

# विद्यापीठ कार्यक्षेत्रातील १,५९४ विद्यार्थ्यांचे लसीकरण

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

मिशन युवा स्वास्थ्य अभियानास प्रारंभ झाला आहे. उपक्रमाच्या दुसऱ्या दिवशी शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील महाविद्यालयातील सुमारे १,५९४ विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांचे लसीकरण झाले असून प्रतिसाद वाढत आहे.

कोल्हापूर विभागीय उच्च शिक्षण सहसंचालक कार्यालयातर्फे मंगळवारी सांगली, सातारा व कोल्हापूर जिल्ह्यातील १९ महाविद्यालयांत लसीकरण कॅम्प घेण्यात आले. यात कोव्हिशिल्डचा पहिला डोस १,०८२, दुसरा डोस ४१८ जणांनी घेतला. कोव्हॅक्सीनचा पहिला डोस ५४ व दुसरा डोस ४० जणांनी घेतला. दोन-तीन दिवसांत जास्तीत-जास्त विद्यार्थ्यांचे लसीकरण करण्याचा प्रयत्न असणार आहे, अशी माहिती कोल्हापूर विभागीय उच्चशिक्षण सहसंचालक डॉ. हेमंत कटरे यांनी दिली.

पुढारी

# एम.फिल, पीएच.डी. प्रवेश परीक्षेला पहिल्या दिवशी १२४५ विद्यार्थी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठातर्फे शैक्षणिक वर्ष २०२१-२२ या वर्षासाठी एम.फिल, पीएच.डी. प्रवेश परीक्षा मंगळवापासून सुरू झाली. पहिल्या दिवशी १९२३ पैकी १२४५ विद्यार्थी परीक्षेला बसले.

विद्यापीठ परीक्षा विभागातर्फे श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय (कोल्हापूर), श्रीमत मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय (सांगली) व सातारा येथील यशवंतराव चव्हाण इन्स्टियूट ऑफ सायन्स महाविद्यालयात या केंद्रावर परीक्षा घेण्यात आली. सिव्हील इंजिनिअरींग, केमेस्ट्री, कॉम्प्युटर अॅप्लीकेशन, लायब्ररी अँड इन्फॉर्मेशन सायन्स, एज्युकेशन, फार्मसी, बिझनेस मॅनेजमेंट, जर्नालिझम, बायो-केमेस्ट्री, हिस्ट्री, फूड सायन्स अँड टेक्नॉलॉजी विषयाच्या परीक्षा झाल्या. परीक्षा सुरळीतपणे सुरू झाल्या असून २८ ऑक्टोबरपर्यंत या परीक्षा चालणार आहेत.

परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेत काही शंका, त्रुटी, आक्षेप असल्यास विद्यापीठाच्या रींळिपींशपीं.रऽ ींपिळीहर्ळींरक्षळ.रल.ळप या ई-मेलवर विद्यार्थ्यांनी तक्रार पाठवून द्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी.आर.पळसे यांनी केले आहे.

तरूण भारत

# शासकीय तंत्रनिकेतनमध्ये शुक्रवारी लसीकरण कॅम्प

**कोल्हापूर :** महाराष्ट्र शासन तंत्र शिक्षण विभाग व आरोग्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यात २५ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर दरम्यान 'मिशन युवा स्वास्थ अभियान" राबविले आहे.यातंर्गत शासकीय तंत्रनिकेतन संस्थेतील १८ ते २२ वयोगटातील विद्यार्थी, विद्यार्थीनी त्यांचे पालक, संस्थेचे अधिकारी, कर्मचारी, त्यांचे नातेवाईक यांचे १०० टक्के लसीकरण होण्याच्या दृष्टिने शासकीय तंत्रनिकेतन कोल्हापूर (विद्यानगर, राजाराम महाविद्यालयाच्या पाठीमागे) येथे २९ रोजी सकाळी १० ते दुपारी १२ या वेळेत कोरोना लसीकरण कॅम्पचे आयोजन केले आहे. तरी विद्यार्थी, कर्मचारी, त्यांचे नातेवाईक यांनी लसीकरण कॅम्पमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन संस्थेचे प्राचार्य डॉ. दत्तात्रय गर्गे यांनी केले आहे.

**मंगळवारी १ हजार ५९५ विद्यार्थ्यांचे लसीकरण**

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत १६ महाविद्यालयांमध्ये मंगळवारी लसीकरण कॅम्प झाला. यातंर्गत १ हजार ५९५ विद्यार्थ्यांना कोविशिल्ड, कोव्हॅक्सिन लस देण्यात आली,

तरूण भारत

# एम. फिल., पीएच. डी. प्रवेश परीक्षा सुरळीत

कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत गुरूवारपासून विविध ४५ विषयांची एम. फि., पीएच. डी.ची प्रवेश परीक्षा सुरळीत पार पडली. १९२३ विद्यार्थ्यांपैकी १२४५ विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली. तर ६७८ विद्यार्थी अनुपस्थित होते अशी माहिती शिवाजी विद्यापीठ परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक गजानन पळसे यांनी दिली.

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२१-२२ साठी एम. फिल., पीएच. डी. ची प्रवेश परीक्षा घेण्यात आली. कोल्हापूर जिल्ह्यासाठी शहाजी कॉलेज, सांगली जिल्ह्यासाठी श्रीमती मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय, सातारा जिल्ह्यासाठी यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स या महाविद्यालयांमध्ये ऑफलाईन पध्दतीने ओएमआरसीटवर ही परीक्षा झाली. ही प्रवेश परीक्षा ४५ विषयांसाठी असून २८ ऑक्टोंबरपर्यंत तीन सत्रात सुरू राहणार आहे. तीन दिवसात ५६०० विद्यार्थी परीक्षा देणार आहेत.